“लघु सिंचन तलावाच्या सिंचनाच्या लाभार्थी शेतक-याच्या सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचा अभ्यास”
(विशेष संदर्भ नांदेड जिल्हा)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विज्ञान विद्याशाखेअंतर्गत समाजशास्त्र या विषयातील
पीएच.डी. पदवी करिता सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक

उत्तम देवबा गायकवाड

एम.ए.(समाजशास्त्र), सेट

मार्गदर्शक

प्राचार्य, डॉ.मनोहर तोटरे

प्रोफेसर तथा समाजशास्त्र विभाग प्रमुख,
शाहीर अण्णाभाऊ साठे महाविद्यालय, मुखेड, जि.नांदेड

संशोधन केंद्र

समाजशास्त्र संकुल

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

फेब्रुवारी 2024

प्रस्तावना:

सिंचन ही मानव निर्मित प्रक्रिया आहे. जल ही राष्ट्रीय संपती आहे. जल संपतीचा उपयोग आधुनिक पद्धतीचा उपयोग करून काटकसरीने व कार्यक्षमतेने करणे आवश्यक आहे. सन 1942-46 च्या दरम्यान भारतीय पातळीवर जल सिंचनाचा योजनाबद्ध विकास करण्यासाठी व्यापक स्वरूपात धोरण विकसित करण्याचा प्रयत्न केला गेला.

देशातील ज्या भागात जलसंपती अधिक आहे, तेथील जलसंपत्तीचा उपयोग एका खो-यातील पाणी दुस-या खो-यात नेऊन कमी जलसंपत्ती असलेल्या भागात वा प्रदेशात उपयोगात आणणे आवश्यक आहे.

येत्या काळात पाणी वाटपाचा आणि सिंचनाचा प्रश्न कसा हाताळला जातो त्यावर बराचसा विकास अवलंबून आहे. एकीकडे आज महाराष्ट्रात पाण्याची टंचाई मोठ्या प्रमाणावर आहे, तर दुसरीकडे सिंचनाच्या पाण्याचा खूप मोठ्या प्रमाणावर अपव्यय होताना दिसतो. नदीच्या अथवा नाल्याच्या अथवा कुठल्याही जलप्रवाहाच्या पात्रात पाण्याचा प्रवाह आडवुन त्याचा मोठ्या प्रमाणावर साठवण करण्यासाठी बांधण्यात येणा-या भिंतीस धरण म्हणतात. धरण हे योग्य स्थळी जलप्रवाहाच्या एका काठापासून दुस-या कठापर्यंत बांधलेली एक विस्तृत भिंतच असते. अनेक वेळा लहान मोठ्या नाल्यामधून वाहत्या पाण्याची पातळी उंचावणे आणि ते वळविणे याकरीता जलप्रवाहाच्या पात्रात जी लहान भिंत बांधतात तिला लघु बंधारा अथवा लघु तलाव म्हणतात. पाण्याचा सुव्यवस्थित वापर व्हावा यासाठी ही जलसिंचन पद्धती महत्वपूर्ण मानली जाऊ लागली.

पाणी हे निसर्ग निर्मित स्त्रोत आहे. पृथ्वीवर उपयोगी, वापरण्याजोगे पाणी अत्यंत कमी आहे. पृथ्वीवर उपलब्ध एकूण पाण्याच्या 2% इतकेच पाणी मानवास वापरण्यायोग्य आहे. त्यामुळे पाण्याचा वापर योग्य आणि

काटकसरीने होणे ही आजची नितांत गरज बनली आहे. वाढती लोकसंख्या व त्या प्रमाणात वाढती पाण्याची गरज लक्षात घेता शास्त्रोक्त शेती व सिंचनाच्या पद्धती वापरणे आणि पाण्याचा कार्यक्षम वांपर करणे या करिता सिंचन प्रक्रियेत शेतक-यांचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे.

भारतीय ग्रामीण समाजातील बहुतांशी लोक शेती व्यवसायात गुंतलेले आहेत. शेती करणा-यांची संख्या ग्रामीण भारतात मोठी आहे. जमिनीचे विषम वितरण हे भारतीय कृषी व्यवस्थेचे एक प्रभेदक लक्षण आहे. त्यामुळे श्रीमंत,मध्यम,लहान शेतकरी आणि सीमान्त शेतकरी असे शेतक-यांचे विविध प्रवर्ग ग्रामीण समुदायात दिसतात. शेतीच्या आणि शेतक-यांच्या विकासासाठी जमिनीला पाणी उपलब्ध होणे आवश्यक आहे . त्यासाठी सिंचन व्यवस्थेचा विकास आणि विस्तार होणे गरजेचे आहे. जमिनीच्या विषम वितरणामुळे निर्माण झालेल्या आर्थिक विषमतेमुळे अनेक मध्यम शेतकरी,लहान आणि सीमान्त शेतकरी पाण्यासारखी नैसर्गिक साधन संपती उपलब्ध करून घेऊ शकत नाही. त्यामुळे त्यांची शेती पावसाच्या लहरीपणावर अवलंबून आहे. परिणामी त्यांचा आर्थिक विकास घडून येणे शक्य होत नाही. शेती आणि उद्योग क्षेत्रातील संतुलित विकासासाठी जलसिंचन ही योजना ओळखली जाते. दोन्ही क्षेत्राना पाण्याची आवश्यकता असते म्हणून सिंचनास कोणत्याही योजनेच्या दीर्घकालीन उद्दीष्टात उच्च प्राधान्य मिळाल्याचे दिसते.

केंद्र शासनाने १९८७ साली राष्ट्रीय जलनीती धोरण मंजूर केले. तसेच शासन स्तरावर तयार केलेल्या सिंचन अहवालात, सिंचन प्रक्रिया कार्यक्षेम होणेकरिता सिंचन प्रक्रियेत शेतक-यांचा सहभाग पूर्णतः आवश्यक मानला जाऊ लागला. महाराष्ट्र शासनाने विशेष करून १९९१ पासून सिंचन प्रक्रियेत शेतक-यांचा सहभाग असावा याकरिता अनेक आदेश,परिपत्रके

निर्गमित केलेले आहेत. महाराष्ट्र शासन सिंचन योजनेत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहे. परंतु याकडे गांभीर्याने लक्ष दिले जात नाही.

सिंचन प्रकल्प निर्मिती ते सिंचन व्यवस्थापन या प्रक्रियेमध्ये शेतकारी यांना सहभागी करून घेतल्यास प्रकल्पाची सिंचन क्षमता वाढविणे शक्य होईल, परिणामी एकूणच शेतकरी व अन्य घटकांचा विकास होण्यास मदत होईल. प्रकल्पाची यशस्वीता लोकांच्या सहभागावरच अवलंबून असते. त्यामुळे सिंचन प्रकल्पात पाणी वापर कर्त्यांचा सहभाग वाढविल्याशिवाय अशा प्रकल्पाचे उद्दीष्ट साध्य होऊ शकत नाही. म्हणून एका दृष्टीकोनातून या विषयाचे सामाजिक महत्व असून त्याबाबत संशोधन होणे काळाची गरज आहे हे लक्षात घेता या विषयाची काही उद्दीष्टे अभ्यासाच्यादृष्टीने निश्चित केली आहेत.

संशोधनाची उद्दीष्टे:

“लघु सिंचन तलावांच्या सिंचनाच्या लाभार्थी शेतक-याच्या सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचा अभ्यास”या विषयाचे सामाजिक महत्व लक्षात घेता या विषयाच्या अनुषंगाने कांही अडचणी समजावुन घेऊन नैसर्गिक संसाधनांचा उपयोग कशा पद्धतीने करून घेता येईल याकरिता संशोधन होणे व त्या अनुषंगाने उपाय योजना सुचविणे आवश्यक आहे. अशा विषयाचा सूक्ष्म चिकित्सक व विश्लेषणात्मक अभ्यास करणे हे या संशोधनाचे प्रमुख **उदिष्ट** आहे. त्या अनुषंगाने खालील उदिष्ट यांचाही त्यात समावेश होतो.

१. शेतक-यांना सिंचन प्रकल्पाच्या विकास व व्यवस्थापनात सहभागी करून प्रकल्पीय **उदिष्ट प्राप्त करण्याच्या प्रयत्नांचा** आणि पाणी वापर संस्थांचा अभ्यास करणे.

२. सिंचन प्रकल्प विकास व व्यवस्थापन अधिकार शासनाकडून शेतक-याकडे पाणी वापर संस्थेच्या माध्यमातून हस्तांतर करून शासनाचा प्रकल्प व्यवस्थापन,देखभाल,दुरुस्ती यावरील प्रशासकीय खर्चाची स्थिती जाणून घेणे.

३. प्रकल्प सिंचनात शेतक-यांच्या सहभागाचा अभ्यास करणे.

४. कमीत कमी पाण्याचा उपयोग करून जास्तीत जास्त उत्पन्न वाढविण्यासाठी शेतक-यांचा सहभाग वाढविण्यासाठीच्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.

५. सिंचन प्रकल्प हे समाज विकासाचे मुख्य साधन आहेत म्हणून समजशास्त्राच्या अभ्यासात सिंचन प्रक्रियातील विकास व व्यवस्थापन संकल्पना स्पष्ट करून प्रकल्पाच्या यशस्वीतेतून झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास करणे .

६. सहभागीय सिंचन पद्धतीचा अवलंब केल्याने शेतक-यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितित झालेल्या बदलांचा आढावा घेणे.

७. पाणी वापरसंस्थाना प्रकल्पाचे सिंचन,देखभाल, दुरुस्ती कामात येणा-या अडचणी व समस्या यांचा अभ्यास करून त्यांच्या समस्येवर योग्य उपाय सुचविणे.

८. विविध सिंचन विषयक कायदे शेतक-यांना कसे उपयुक्त आहेत त्याचा शोध घेणे.

गृहीतकृत्ये:

१. सिंचन प्रकल्पाच्या सिंचन,देखभाल, दुरुस्ती प्रक्रियेत शेतक-यांचा सहभाग घेतल्यास प्रकल्पिय सिंचन क्षमता वाढण्यास मदत होते.

२. शेतक-यांच्या सहभागामुळे **पाणी पट्टी** वसूल होऊन प्रकल्पाची देखभाल व दुरुस्ती योग्य पद्धतीने होते .

३. शेतक-यांच्या सहभागामुळे पाण्याचा वापर काटकसरीने व कार्यक्षम होतो.

४. शेतक-यांच्या सहभागामुळे शेती उत्पादनात आधुनिक तंत्रज्ञान व आधुनिक सिंचन पद्धतीचा वापर करण्याकडे शेतक-यांचा कल वाढतो.

५. शेतक-यांच्या सहभागामुळे प्रकल्पग्रस्त यांचे पुनर्वसन, भूसंपादन इ. योग्य प्रकारे होण्यास मदत होते.

६. शेतक-यांच्या सहभागामुळे शेतीची उत्पादकता वाढून त्यांच्या आर्थिक व सामाजिक दर्जात परिवर्तन झाले आहे.

७. शेतक-यांच्या सहभागामुळे सिंचन व्यवस्थापन व सिंचन विकास योग्य प्रकारे होतो.

८. लाभधारकांच्या पाणी वापर संस्थेमुळे पाणी पट्टीचे दरनिश्चित करण्याचे स्वातंत्र्य कायद्याने लाभधारक यांना प्राप्त होते,पर्यायाने ते प्रकल्पाचे खरे मालक बनतात.

तथ्य संकलन:

सामाजिक संशोधनात अनुभव प्रमाणित तथ्ये संकलित करावी लागतात व त्याच्या आधारे निष्कर्ष प्रतिपादन केले जाते.त्यामुळे तथ्य संकलन हे संशोधन कार्यातील एक महत्वाचे व प्राथमिक कार्य आहे. तथ्य एक घटना आहे की, तिच्या निरीक्षण आणि मापनाच्या विषयाबाबत सर्वामध्ये अधिक प्रमाणात सहमत आढळून येते. “तथ्य एक अनुभवसिध्द सत्यापनीय निरीक्षण आहे” संशोधकाने तथ्य संकलनात खालील स्त्रोतांचा वापर करण्याचे ठरविले आहे.

- प्राथमिक स्त्रोत
- दुय्यम स्त्रोत

- प्राथमिक स्त्रोत:

प्राथमिक स्त्रोतामध्ये प्रश्नावली आणि अनुसूची या दोन्ही तंत्राचा वापर करण्यात येणार आहे. प्रश्नावलीसाठी काही उत्तरदाते हे अधिकारी वर्ग, काही शेतकरी शिक्षित आहेत तर काही उत्तरदाते हे अल्पशिक्षित, निरक्षर आहेत. त्यासाठी अनुसूची वापरली जाणार आहे. त्यामुळे उत्तरदात्याशी प्रत्यक्ष संपर्क साधून त्यांच्याकडून माहिती भरून घेतली जाणार आहे.

- दुय्यम स्त्रोत:

तथ्य संकलनाच्या दुय्यम स्त्रोतात संशोधन विषयाच्या अनुषंगाने प्रकाशित ग्रंथ, शासकीय व निमशासकीय अहवाल, शोधप्रबंध, मासिके, त्रैमासिके, दैनिके, सिंचन आयोग अहवाल, जागतिक अहवाल, विविध समित्यांचे अहवाल, आणि संशोधन विषयाशी संबंधीत प्रकाशित व अप्रकाशित माहिती तथ्य संकलनाचे दुय्यम स्त्रोत वापरण्यात येणार आहे.

संशोधन आराखडा:

संशोधनास योग्य दिशा मिळावी, उपयुक्त संशोधन व्हावे म्हणून वर्णनात्मक संशोधन आराखडा प्रमाण समजले जाईल. तसेच विश्लेषणात्मक प्रारूप वापरले जाईल, जेणे करून संशोधन विषयाचे सुस्पष्ट वर्णन होईल आणि त्या तलावाच्या लाभार्थी शेतक-याचा सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचा अभ्यास करण्यात येईल.

नमूना निवड:

लघु सिंचन तलाव सिंचन क्षमता ० हेक्टर ते २००० हेक्टर हे लघु सिंचन तलाव या अंतर्गत येतात त्या मुळे हे सर्व तलाव लघु सिंचन तलाव या संज्ञा अंतर्गत येतात. त्याअनुषंगाने नांदेड जिल्ह्यात एकुण किती लघू सिंचन तलाव आहेत. त्यापैकी नमुना निवड पध्दतीने काही लघू सिंचन तलावाची निवड करण्यात येणार आहे व त्या सिंचन तलावावरील सिंचन करणा-या सर्वच लाभार्थी शेतक-यांची अभ्यासासाठी निवड करण्यात येणार आहे.

संशोधन क्षेत्र:

या विषयाची व्यापकता लक्षात घेता संशोधनाच्या दृष्टीने महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यातील एक लघु सिंचन तलाव संशोधनासाठी निवड करण्यात येत आहे. त्यामुळे लघु सिंचन तलाव अंतर्गत लाभार्थी शेतकरी यांच्या सहभागातून लघु सिंचन तलावाच्या सिंचन प्रक्रियेचा व्यापक व सुक्ष्म अध्ययन करणे शक्य होईल.

पूर्व संशोधन साहित्याचा आढावा:

सिंचन तलावांच्या सिंचन प्रक्रियेत शेतक-यांचा सहभाग किंवा सिंचन व्यवस्थापन हस्तांतरण या बाबत जगात वेगवेगळ्या देशातील संस्था,संशोधक,संघटना,विद्यापीठ यांनी अध्ययन केलेले आहे. ज्यामध्ये जागतिक बँक,अन्न व शेती संघटना (एफएओ), इंटरनॅशनल इन्स्टीटयुट ऑफ वॉटर मॅनेजमेंट ,भारतातील वाल्मी संस्था,जलसंपदा खाते,सेवाभावी संस्था तसेच अनेक संशोधक यांनी या विषयावर संशोधन केलेले आहे.

झालेल्या संशोधनाचा आढावा घेणे हे पुढील संशोधन कार्यासाठी अत्यंत आवश्यक असते त्या नुसार विविध प्रकल्पावर झालेल्या संशोधन कार्याचा आढावा थोडक्यात खालील प्रमाणे घेता येईल.

जार्ज चक्काचेरी यांनी केरळ मधील नायर सिंचन प्रकल्पावर केलेल्या संशोधनातून मांडलेले निष्कर्ष लक्ष वेधी आहेत. शेतक-याना जेव्हा आवश्यक आहे तेव्हा पाणी मिळत नाही,कालव्याच्या शेवटच्या टोकाला असलेल्या भागातील शेतकरी यांना आवश्यकता आहे, तेव्हा पाणी मिळत नाही,पाणी उपलब्धतेवरच शेतकरी यांचा सहभाग अवलंबून दिसून येतो.[१]

नॉर्मन अपहूप आणि सि. एम. विजायरत्ना यांनी श्रीलंकेत गाल ओय सिंचन प्रकल्पावर केलेल्या संशोधन यातून असे दिसून आलेले आहे कि,शेतकरी यांच्या सिंचन प्रक्रियेतील सहभागामुळे सिंचन क्षेत्रात वाढ झालेली दिसून आलेले आहे,पाणी उत्पादकतेत वाढ झालेली दिसून आलेली आहे,सिंचन क्षेत्र २६००० एकर वरुण वाढ होवून ६०००० एकर पर्यन्त पोहचले आहे.[२]

गेरीट व्हॅन हयुरेन यांनी बेनी अमीर सिंचन प्रकल्प मोरोक्को येथील प्रकल्पावर केलेल्या संशोधन चे निष्कर्ष सुद्धा विशेष आहेत . केंद्र सरकारचा प्रभाव हा सहभागीय सिंचन प्रक्रियेवर पडतो,तसेच प्रभावी स्थानिक नेता हा शेतका-यावर प्रभाव पाडू शकतो,पाणी वापर संस्था कमजोर असून पाणी वापर संस्थेचा सहभाग कोणत्याही धोरणात्मक निर्णयात कमी असतो.[३]

गोपाल नाईक आणि अमर एच. कालरी यांनी महाराष्ट्रातील मुळा धरण अहमदनगर यावरील दत्त सहकारी पाणी वितरण संस्था चांदा जि. अहमदनगर आणि उजणी धरण माढा तालुका सोलापूर या प्रकल्पावरील सिद्धेश्वर पाणी वाटप संस्था शेवरे या पाणी वापर संस्थांचे अध्ययन करून असे निष्कर्ष मांडलेले आहेत ते उद्बोधक आहेत .

दत्त सहकारी पाणी वापर संस्था घनमापन पद्धतीने पाणी मोजून घेते. तसेच त्यांचे प्रत्यक्ष सिंचन ११९ हेक्टर यावरून वाढून २६१ हेक्टर झालेले आहे. संस्थेचे आर्थिक उत्पन वाढलेले आहे. एकूण सिंचन वाढलेले आहे.

सिद्धेश्वर पाणी वाटप संस्था, शेवरे ही संस्था सिंचन खात्याकडून पाणी घनमापन पद्धतीने मोजून घेते आणि पीक क्षेत्रानुसार सभासदांना पाणी पट्टी आकारणी करते. शासनाची पाणी पट्टी वेळेवर भरते त्यामुळे संस्थेस पाणी पट्टीत ५% सूट शासनाकडून मिळते असते. शेतक-याकडून पाणीपट्टी वेळेवर वसूल होते आणि पाण्याचा वापर कार्यक्षमतेने करते.(४)

पुष्प राज खनाल यांनी पंचकन्या व खागेरी येथील प्रकल्पावर केलेल्या संशोधनावरून त्यांना असे दिसून आलेले आहे की,पाण्याची उपलब्धता वाढली,सिंचन क्षेत्र वाढले आणि पीक पद्धतीत बदल दिसून आला. असे असूनही संस्थेस् आर्थिक संकटाना तोंड द्यावे लागत होते असा निष्कर्ष मांडलेला आहे.(५)

के. मधवा चंद्रन , जार्ज चक्काचेरी यांनी चेराकुझी प्रकल्प केरला येथील प्रकल्पावर केलेल्या संशोधनावरून काही निष्कर्ष मांडलेले आहेत ते असे तलावातील पाण्याची उपलब्धता,शेतीचे स्थळ/ठिकाण हे दोन घटक शेतक-यांच्या सहभागावर परिणाम करतात,पाण्याची मुबलक उपलब्धता,वेळेवर आणि समन्यायी पाणी पुरवठा हे घटक शेतक-यांना पाणी वापर संस्थेत सहभागी होण्यास प्रवर्तक घटक आहेत.(६)

डॉ.गुलाब सिंग नारवाल यांनी पाटबंधारे खाते हरीयाणा या राज्यातील अभ्यासावरून असे मांडलेले आहे की वार्षिक सिंचन क्षमता ९.५०% ने वाढलेले होते आणि शेतक-यांच्या उत्पनात ११% नी वाढ झालेली होती तर परिणामी पाणी पट्टी १०.४०% ने वाढ झालेली दिसली एकूणच शेतक-यांमधे संघर्षाचे प्रमाण कमी झाल्याचे निष्कर्ष त्यांनी मांडलेले आहेत.(७)

डेविड ग्रोयन फेल्ड यांनी जपनीज इन्स्टिट्यूट ऑफ इरीगेशन अँड ड्रेनेज यांच्या करीता एक रीपोर्ट तयार केलेला असून त्यामध्ये त्यांनी मांडलेले आहे की प्रकल्प देखभाल व दुरूस्तीचा प्रश्नच खरा पाणी वापर संस्था स्थापन करण्याचा मुख्य प्रवर्तक घटक आहे.(८)

देबाराज स्वैन यांनी ओरीसा राज्यातील पाणी पंचायत यांच्या यशस्वी सिंचन विकासावर संशोधनाअंती असे निष्कर्ष मांडलेले आहेत.प्रभावी सिंचन व्यवस्थापनात शेतक-यांना तांत्रिक ज्ञान नसणे, आर्थिक नुकसानीची भिती, पुढारित्वाचा कमीपणा,प्रशिक्षण व प्रचाराचा अभाव,शासकीय कर्मचा-यांचा नियमित आधार न मिळणे या अडचणी मांडलेल्या आहेत. तसेच यामुळे होणारे फायदे सुद्‌धा मांडलेले आहेत ते असे की , पीक पद्‌धती घेण्याचे स्वातंत्र असते त्या मुळे कमी कालावधीत येणारी पिके घेता येतात,पिकांची उत्पादकता वाढते,खतांचा वापर योग्य प्रकारे करतात. पिकांच्या उत्पादकतेत वाढ होऊन देखभाल व दुरुस्ती करीत पैसे उपलब्ध होतात.[(९)]

इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, खरगपूर यांचे मॉड्युल -३ इरीगेशन इंजीनीरिंग प्रिन्सीपल्स व्हर्जन-२ सिई यामधील ३.१९ पार्टीशिपनरी इरीगेशन मॅनेजमेंट या मध्ये त्यांनी स्पष्ट मांडलेले आहे की,सिंचन प्रकल्प देखभाल,दुरुस्ती लाभार्थींच्या सहभागशियाय यशस्वी होऊ शकत नाही व सिंचन प्रकल्पाचे पूर्ण साठवण उपयोगात येऊ शकत नाही.[(१०)]

इंजी. एस.व्ही. सोडल यांनी त्यांच्या संशोधन शोध निबंधात असे स्पष्ट केलेले आहे की,सिंचन क्षेत्रामध्ये मोठी समस्या अशी आहे की,निर्मित सिंचन साठयाचा वापर योग्य व कार्यक्षम होत नाही,पाणी वापरकर्त्यामध्ये तंटे आहेत,पाणी वापराची कार्यक्षमता कमी असून गुंतवणुकीची परतफेड होत नाही. परंतु पाणी वापर संस्थांच्या निर्मितीमुळे पाणी पट्टी वसुलीत कमालीची वाढ झालेली असून देखभाल व दुरुस्तीत सुधारणा होऊन सिंचन क्षेत्रात वाढ होत आहे व पाण्याच्या वापर कार्यक्षमतेत उल्लेखनीय वाढ झालेली आहे.[(११)]

इंजी.बेलसरे यांनी आपल्या पीएच.डी. संशोधन करिता काटेपूर्णा प्रकल्प अभ्यासासाठी घेतलेला होता. त्यांनी केलेल्या सुधारणा पैकी सहभागीय सिंचन व्यवस्थापन हे पाणी वापर संस्था स्थापन करून केलेले सुधारणा पैकी एक होते. त्यामुळे सुरवातीस २०२७ हे. सिंचन वरुन २५४६ हे. सिंचन पर्यंत वाढ झालेली

आहे. लाभार्थी संख्या २००० वरुन वाढ होऊन ३३७० पर्यंत गेली असल्याचे त्यांच्या संशोधनकार्यातून दिसून आले आहे.[१२]

राष्ट्रीय जलनीती (१९८७-२००२) यामधील पाणी संसाधने व्यवस्थापनात सहभागीय अप्रोच अनूछेद-१२ मध्ये स्पष्ट करण्यात आलेले आहे की,पाणी संसाधने व्यवस्थापनात शासन व्यवस्थेसह पाणी वापरकर्ते व इतर लाभार्थी यांना सहभागी करणे आवश्यक आहे त्या करिता योग्य ते कायदे करण्याचे निर्देश दिलेले आहेत.[१३]

महाराष्ट्र राज्य जलनीती राष्ट्रीय जलनीती धोरणास अनुसरून देशातील वेगवेगळ्या राज्य यांनी पाण्याचे महत्व ओळखून आपापल्या राज्याचे राज्य जलनीती धोरण जाहीर केलेले आहेत. त्याच प्रमाणे महाराष्ट्र शासनाने आपली जलनीती जाहीर केलेली आहे. त्यामधील परीछेद २.२.२ मध्ये सिंचन प्रणालीचे शेतक-यामार्फत व्यवस्थापन या अंतर्गत सिंचन व्यवस्थापनात शेतक-यांचा सहभाग अनिवार्य करण्यात आला पाहिजे असे स्पष्ट केले आहे.[१४]

संशोधनाचे महत्व:

वरील संशोधन अशा स्वरूपाचे झालेले असले तरी यापेक्षा माझे संशोधन वेगळे असणार आहे म्हणून माझ्या संशोधनास वेगळे महत्व राहणार आहे.प्रस्तुत संशोधन हे लघु सिंचन तलावाच्या सिंचनाच्या लाभार्थी शेतकऱ्याच्या सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचा अभ्यास या संदर्भात केले जाणार आहे. हा अभ्यास काही निव्वळ त्याची माहिती नाही तर सिंचन तलाव योजनेच्या सिंचन विकास व सिंचन व्यवस्थापनात शेतक-यांचा कोणत्या स्वरूपाचा सहभाग राहिलेला आहे व त्यातून शेतक-यांचा विकास कसा होत गेला याचे आकलन करून घेण्याचा प्रयत्न आहे. एकूणच या योजनामुळे शेतक-यांच्या पुर्वीच्या जीवनमानात कसा बदल घडून आला आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न आहे. लघु सिंचन प्रकल्पातील शेतक-यांच्या सहभागामुळे शेतक-यांचा विकास घडून येण्यास

मदत झाली आहे. या पार्श्वभूमीवर ज्यांचा केंद्रबिंदू हा शेतकरी व त्याचे कल्याण असेल अशा विचारांची मांडणी होणे आवश्यक आहे. याच दृष्टीने लघु सिंचन तलाव या योजनेच्या विकास आणि शेतक-यांचा सहभाग याचे महत्त्व आजही किती उपयुक्त आहे याचे आकलन होणे महत्वाचे ठरते. या योजनेच्या विकासामुळे लोकांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे एकूणच या योजनेमुळे मानवी विकासाला चालना मिळाली त्या वेगवेगळ्या पैलूंचा अभ्यास अनेक संशोधकानी केला आहे.

अशा प्रकारचे संशोधन झालेले असले तरी अन्य संशोधकाकडून या विषयाच्या अनुषंगाने काही भाग वा अभ्यास त्या मानाने जो दुर्लक्षित राहिला आहे त्यावर प्रकाश टाकण्याचा प्रामाणिक प्रयत्न राहणार आहे म्हणून या संशोधनास वेगळे असे महत्व राहणार आहे.

जागतिक स्तरावर सिंचन व्यवस्थापनात लाभार्थी शेतक-यांच्या सहभागाचे महत्व आता समजू लागले आहे. त्या दृष्टीने विविध देशामध्ये या बाबतीत संशोधन होताना दिसत आहे. या कार्याचा एक भाग म्हणून भारत देशामध्ये विविध राज्यामध्ये नदी जोडणीच्या प्रकल्पाला शासनाने नुकतीच परवानगी दिली आहे. म्हणून या विषयावर संशोधन होणे काळाची गरज आहे.

महाराष्ट्रामध्ये देशातील एकूण धारणांच्या ५०% इतकी संख्येने धरणे आहेत. लघु सिंचन प्रकल्पाची संख्या महाराष्ट्रात ६०००० इतकी आहे. महाराष्ट्रात विविध कायद्याच्या माध्यमातून सिंचन व्यवस्थापनात शेतक-यांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न होत आहेत. त्यामुळे लघु सिंचन योजनात शेतक-यांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने जाणीव निर्माण करणे हा या संशोधनाचा मुख्य हेतू आहे. अशा पार्श्वभूमीवर या योजनेच्या सिंचन प्रक्रियेत शेतक-यांचा सहभाग या विषयाचे आकलन वा अभ्यास होणे महत्वाचे ठरते. या अनुषंगाने केलेला हा अभ्यास विद्यार्थी,संशोधक,सामाजिक व राजकीय कार्यकर्ते आणि शासन इ. यांना उपयुक्त ठरणार आहे.

अभ्यास विषयाच्या मर्यादा व संशोधन कालावधी:

“लघु सिंचन तलावांच्या सिंचनाच्या लाभार्थी शेतक-यांच्या सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचा अभ्यास:विशेष संदर्भ नांदेड जिल्हा”या प्रस्तुत संशोधनासाठी नांदेड जिल्ह्यातील एक लघु सिंचन तलाव निवडण्यात येणार आहे. तसेच या संशोधन कार्याचा कालावधी साधारणपणे तीन वर्षाचा अभिप्रेत आहे.

संशोधन प्रकरणाची मांडणी:

प्रस्तुत संशोधन कार्यात सुसूत्रता यावी व शास्त्रीय पद्धतीने अध्ययन करता यावे याकरीता प्रकरणाची विभागणी खालील प्रमाणे करण्यात येणार आहे.

प्रकरण-१ : प्रस्तावना

प्रकरण-२ : संशोधन समस्या आणि अभ्यास पद्धती

प्रकरण-३ : सिंचन प्रक्रियेत सहभागी शेतक-यांची वैयक्तिक आणि कौटुंबिक पार्श्वभूमी

प्रकरण-४ : शेतक-यांचे आर्थिक जीवन

प्रकरण-५ : सिंचन प्रक्रियेत सहभागी शेतक-यांच्या समस्या, कारणे, परिणाम व उपाय योजना

प्रकरण-6 : निष्कर्ष

संदर्भ:

1) George Chakkacheryy – Farmers Participation in Irrigation Management George Chakkacherry.

2) Norman Uphoff & C.M. Wijayaratna – Demonstrated Benefits from Social Capital: The Productivity of Farmer Organizations in Gal Oya, Sri Lanka. (World Development Vol.28, No.11, pp, 1875-1890, 2000

3) Gerrit Van Vuren, Celine Papin, Nawal El-Haouari - Participatory Irrigation Management: Comparing Theory with practice a case study of the Beni Amir Irrigation Scheme in Morocco.

4) Gopal Naik and Amar K. Kalro – Two Case Studies on the role of water users Associations in Irrigation Management in Maharashtra, India, The World Bank WBIs CBNRN initiative 17, 1998.

5) Puspa Raj Khanal – Participation and governance in local water management. The paper is based on Authors Doctoral Research in Wageningen University, The Netherlands.

6) K.Madhava Chandran and George Chakkacherry - Short communication Factors influencing farmer participation in irrigation management. (Centre for Water Resources Development and Management, Kozhikode, Kerla, India).

7) Dr.Gulab Singh Narwal – Improving performance of irrigation project through PIM- A case study of Sunder Distributary system, Haryana, India.

8) David Groenfeldt – Background paper on Participatory Irrigation Management , Water and Culture Institute, www.waterculture.org. This is a reprint of a report originally prepared on for the Japanese Institute of irrigation and Drainage (JIID), and distributed at the World Water Forum in Kyoto, Japan in March, 2003.

9) Debaraj Swain – Orissa's Pani Panchayats - a case of successful irrigation management, Centre for River Basin organizations and management, solo Central Java, Indonesia (CRBOM small publications series No.4 Aug. 2009)

10) Module 3 -Irrigation Engineering Principles Version 2 CE IIT Kharagpur P.No.-Para 3.1.9(PIM)

11) Mr S.V.Sodal, Secretary, Maharashtra Water Resources Authority M.S. Reforms Initiatives in Water Resources Sector in Maharashtra State, Paper prepared for the workshop entitled, Legal Aspects of Water Sector Reforms at Geneva 20 to 21 April 2007 By The International Environmental Law Research Centre (IELRC)

12) Er.Sanjay Belsare -Participatory Irrigation Management in Katepurna Irrigation Project: A Success story, ICID Watsave young professionals Award (201) Winning Paper 2001

13) राष्ट्रीय जलनिती,1987, 2002 (Revise) National Water Policy-1987-2002 सुधारणा.

14) राज्य जलनिती,2005, Maharashtra State Water Policy-2005, Para No.2.0 P.No.5

मार्गदर्शक
प्राचार्य डॉ. मनोहर तोटरे
प्रोफेसर तथा समाजशास्त्र विभाग प्रमुख
शाहीर अण्णाभाऊ साठे महाविद्यालय, मुखेड, ता. मुखेड जिल्हा नांदेड

संशोधक
उत्तम देवबा गायकवाड
एम.ए.(समाजशास्त्र),सेट